# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन विभाग

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


MiraBhayandar @2047 Innovate, Connect, Prosper

जा.क्र. मनपा/ घ.व्य. / 201 /2024-25 दि. 18/05/2024

## कार्यालयीन आदेश

**विषय: सखोल स्वच्छता अभियान(Deep Clean Drive) भाग -3**

मान्सुनपुर्व शहर स्वच्छता अभियान दि. 24-25 आणि 31 मे व 1 जुन 2024

संदर्भ – 1) मनपा/घ.व्य./545/2023-24 दि. 6-10-2023

**दि.16/10/23 ते 27/10/23**

2) मनपा/घ.व्य./1078/2023-24 दि.26-12-2023

**दि.28/12/2023 ते दि.15/3/2024**

स्वच्छ भारत अभियान आणि राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम या संकल्पनेला मुर्त स्वरुप देण्यासाठी राज्यांचे मा. मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतून शहरात उपरोक्त संदर्भिय काळात महापालिका व लोक सहभागातून सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहेत. या मोहिमेमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी प्रत्यक्ष सहभाग घेवून शहर वासियांना स्वच्छतेबाबत प्रेरित केले आहेत.

या संकल्पनेचा (भाग-3) दिनांक 24 व 25 मे आणि 31 मे व 1 जुन 2024 या कालावधीत महापालिकेमार्फत मान्सुनपुर्व शहर स्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात येत आहे.

सदरची मोहिम यशस्वीरित्या राबविण्यासाठी खालील प्रमाणे अधिकाऱ्यांना कामे नेमून देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | खाते प्रमुखांचे नाव |
|---|---|---|
| 1 | सखोल स्वच्छता अभियान राबवावयाचे रस्ते/ ठिकाणे निश्चीत करणे. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.)<br>श्री. सचिन बांगर, उपायुक्त (घन व्यवस्था) |
| 2 | रस्ते/प्रभाग निहाय जबाबदार नियंत्रण अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे. (स्वतंत्र आदेश निर्गमित करणे.) | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.)<br>श्री. रवि पवार, उपायुक्त (मु.) |
| 3. | 1) पदपथ व रहदारीस अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे ( टपऱ्या, कुंडया, बॅनर, छपरे, लोखंडी जाळयाचे कंपाउंड इ.)<br>2) पावसाच्या प्रवाहास बाधीत होणारी अनधिकृत बांधकामे<br>3) मोठया पावसात होणारी संभाव्य जीवत हानी टाळण्यासाठी प्राधान्याने दर्शनात येणारी नाल्यावरील व नाल्या लगत असलेली | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्री. रवि पवार, उपायुक्त (अति.नियं.) |

| | | |
|---|---|---|
| | अनधिकृत बांधकामे<br>4) बेवारस वाहने, गॅरेजेस<br>5) रहदारी अडथळा ठरणारे अनधिकृत फेरीवाले/ खाद्य पदार्थ तयार करुन विकणारे खाद्य विक्रेते यांना हटविणे.<br>6) अनधिकृत माती भराव<br>7) वादळामुळे, जोराच्या वाऱ्याने उडून नागरीकांना इजा पोहचेल असे पदपथावरील पत्रे<br>यावर कार्यवाही करणे. | |
| 4. | 1) धोकादायक झाडे काढणे.<br>2) झाडांची छाटणी करणे व त्वरीत उचलून घेणे.<br>3) वृक्षा रोपणासाठी जागा निश्चीत करणे.<br>4) झाडांच्या बुंध्यातील कचरा उचलून घेणे.<br>5) दुभाजकातील कचरा उचलून घेणे./ अवास्तव वाढलेल्या रोपांची छाटणी करणे.<br>6) झाडे/रोपांच्या मुळांची माती सैल करणे.<br>7) घन कचरा प्रकल्पात तयार होणारे खत झाडाच्या बुंद्यापाशी टाकणे.<br>8) सोसायटीच्या बाहेर पडलेल्या सुक्या फांद्या, झावळया उचलून घेणे. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त<br>श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (उद्यान) |
| 5. | 1) विकास कामामुळे तयार झालेले डेब्रीज उचलणे.<br>2) पावसाळयात गटार/नाल्यात पडून होणारे अपघात टाळण्यासाठी सर्व छाकणे, जाळया बसविणे.<br>3) पावसाळयात अपघात टाळण्यासाठी सद्यस्थितीत सुरु असलेली परंतु पावसाळयापुर्वी पुर्ण न होणाऱ्या कामांच्या ठिकाणी चांगले बॅरेकेटींग करणे.<br>4) दिशा दर्शक व सुरु असलेल्या कामाबाबत नागरीकांना सावधानता बाळगण्याची माहिती दर्शविणारे फलक बसविणे.<br>5) रस्त्यावरील खड्डे भरुन घेणे.<br>6) इलेक्ट्रीक बोर्ड, डीपी उघडे पडले असल्यास ते सुस्थितीत करुन घ्यावेत.<br>7) रस्त्यावरील साचलेल्या पाण्याचे निचरा होण्यासाठी नाले/गटारांच्या भींतीस होल मारावेत.<br>8) जेथे दुभाजका मुळे पाणी साचते तेथील मार्ग मोकळा करुन घ्यावा.<br>9) शहरातील भुयारी गटारांवरील मॅनहोल झाकणे सुस्थितीत करणे.<br>10) मल नि:सारण वाहीन्यामधील ब्लॉकेज काढून घेणे. वाहिन्या साफ करणे.<br>11) सखोल स्वच्छता करीता पुर्नवापर पाण्याची व्यवस्था करावी. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता<br>श्री. नितिन मुकणे, कार्य. अभियंता (बांध.)<br>श्री. शरद नानेगांवकर, कार्य. अभियंता (पाणी पुरवठा व मलनि:सारण) |
| 6. | 1) रस्त्यावरील डेब्रीज उचलून घ्यावे.<br>2) सोसायटी मधील दुरुस्ती/नुतनीकरणातून तयार झालेले डेब्रीज | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.) |

| | | |
|---|---|---|
| | उचलून घेणे त्यासाठी होणारा खर्च वसूल करुन घेणे.<br>3) नाल्यावरील छाकणे तपासून घेणे.<br>4) रस्ते, सोसायटीच्या बाहेर पडलेले फर्निचर व इतर साहित्य उचलून घेणे.<br>5) पावसातील पाण्याचा त्वरीत निचरा होण्यासाठी गटारे/नाले सफाई करुन घेणे. सफाई झाली असल्यास बाहेर पडलेला मलबा उचलून घेणे. सफाई योग्यरित्या झाली आहे त्याची खात्री करुन घेणे.<br>6) खुल्या भूखंडावरील कचरा उचलणे व संबंधित जागा मालकास नोटीस देणे व झालेला खर्च वसुल करणे अथवा नगर रचना विभागास बोजा चढविण्यासाठी पत्र देणे.<br>7) ज्या भागात जास्त धुळ, मातीचा राब बसला आहे. व विकास काम पुर्ण झाले आहे तेथे ब्रशच्या सहाय्याने सफाई करुन घेणे असेच रस्ते पाण्याने धुवून घेणे. | श्री. सचिन बांगर, उपायुक्त (घन व्यवस्था) |
| 7 | धोकादायक होर्डींग्ज काढून घेणे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्रीम. कल्पीता पिंपळे, उपायुक्त (जाहिरात) |
| 8 | महापालिका राबवित असलेल्या अभियानाची, अभियानाच्या पुर्वी व अभियांनाच्या दिवशी केलेल्या कामांची माहिती विविध माध्यमाव्दारे प्रसिध्दी देणे. | श्री. राज घरत, जन संपर्क अधिकारी |

अतिरिक्त आयुक्त (सा.प्र.) याच्या मार्गदर्शनाखाली सदरची मोहीत नियोजितरित्या पार पाडावी. सर्व अधिकाऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात कोणताही हलगर्जीपण होणार नाही याची दक्षता बाळगावी. आपल्या विभागाशी संबंधित करावयाच्या कामांचे त्या-त्या विभागाचे खाते प्रमुख/विभाग प्रमुख यांनी नियोजन करावे. आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या नेमणूका कराव्यात.

**(संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.))**
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति-**

१) सर्व विभागप्रमुख/ खातेप्रमुख
२) स्थळ प्रत